शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यात सुरु असलेल्या अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र तंत्रनिकेतनात नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, प्रवेश क्षमतेत वाढ/घट तसेच नवीन अभ्यासक्रमाच्या संस्थांना शासन मान्यता देण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय, क्र. मान्यता-२०१५/(६५/१५)/तांशि-५
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : २५ मे, २०१५

संदर्भ -:१. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचा तंत्र शिक्षण संचालनालयास प्राप्त झालेला दि. ८.५.२०१५ चा ई-मेल.

२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.१०/एनजीपी/मान्यता/२०१५/४२३, दिनांक १२.०५.२०१५

प्रस्तावना -: संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी संदर्भ क्र. २ येथील पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केल्यानुसार, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यात सुरु असलेल्या अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र तंत्रनिकेतनात नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, प्रवेश क्षमतेत वाढ/घट तसेच नवीन पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांना शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -: अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडून पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांना प्राप्त झालेल्या मान्यतेच्या अनुषंगाने अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र तंत्रनिकेतनात सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील Annexure -A-1 /Annexure -A-2, Annexure -B, Annexure -B-1, Annexure -C आणि Annexure -D मधील संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्यानुसार नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, प्रवेश क्षमतेत वाढ/घट



Principal
Dr.R.N.Lahoti Institute of Pharmacy,
Sultanpur,Tq.Lonar Dist Buldana

Principal
Dr.R.N.Lahoti Institute of Pharmacy,
Sultanpur,Tq.Lonar Dist Buldana

तसेच नवीन पदविका अभ्यासक्रम सुरु करणे व अभ्यासक्रम बंद करणे याकरिता शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून खालील अटी शर्तीच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील .सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेची प्रवेश क्षमता विवरणपत्रातील त्यांच्या नावासमोर नमूद केल्याप्रमाणे मर्यादित राहील.

३) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल.तसेच संबधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) सदर पदविका अभ्यासक्रमासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची संलग्नता घेणे आवश्यक आहे.

५) संबंधित संस्थेने संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

६) सदर पदविका अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार/पध्दतीनुसार करण्यात येतील.

७) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी नेमावे व शासन नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावे . तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादी बाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, वांद्रे, मुंबई यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे .तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपुर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयी सुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.



Principal
Dr.R.N.Lahoti Institute of Pharmacy,
Sultanpur Tq.Lonar Dist Buldana

Principal
Dr.R.N.Lahoti Institute of Pharmacy,
Sultanpur Tq.Lonar Dist Buldana

९) सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, वांद्रे,मुंबई यांच्याकडून घेतल्या जातील.

१०) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी)ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

११) रॅगिंग संदर्भात मा .सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

१२) सदर पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

१३) दुसऱ्या पाळीसाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन व संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी विहित केलेल्या/करावयाच्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

१४) याशिवाय संचालक तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संचालक, महाराष्ट्र राज्य, तंत्र शिक्षण मंडळ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

१५) अभ्यासक्रमात बदल झाल्यामुळे / अभ्यासक्रम बंद झाल्यामुळे भविष्यात जी काय परिस्थिती उद्भवते त्या संबंधित संस्था जबाबदार राहतील, कारण त्यांनी तसे लेखी बंधपत्र (Affidavit) दिलेले आहे.

२. सदर शासन निर्णय, राज्य शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेत स्थळावर ठेवण्यात आला असून संकेतांक क्रमांक २०१५०५२५१४१५११८५०८ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(संजय औ. धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

Tashi-5/GR.Doc

Principal
Dr.R.N.Lahoti Institute of Pharmacy,
Sultanpur,Tq.Lonar Dist Buldana



Principal
Dr.R.N.Lahoti Institute of Pharmacy,
Sultanpur,Tq.Lonar Dist Buldana

प्रति,

१. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, वांद्रे(पू) मुंबई - ५१.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय (सर्व), (संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत)
४. संबंधित संस्था (संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत)

प्रत माहितीसाठी:-

१. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१.
२. सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डिंग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई.



Principal
Dr.R.N.Lahoti Institute of Pharmacy,
Sultanpur,Tq.Lonar Dist Buldana

Principal
Dr.R.N.Lahoti Institute of Pharmacy,
Sultanpur,Tq.Lonar Dist Buldana

शासन निर्णय, क्र. मान्यता 2015/(65/15)/तांशि-5 दि. 25 मे, 2015 सोबतचे विवरणपत्र

List of New Unaided Private Diploma Institutes approved for Academic Year 2015-16

Annexure - A-2

| Sr. No. | AICTE Application ID | District | Institute Name | Institute Address | Institution Type | Program | Level | Shift | Full Time/Part Time | Affiliating Body | Course | Approved Intake 15_16 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1-2464837444 | Buldhana | GAWANDE COLLEGE OF PHARMACY | LAVALA ROAD,SAKHARKHERDA TQ-SINDHKHEDRAJA,DIST-BULDANA | Unaided - Private | PHARMACY | DIPLOMA | 1st Shift | FULL TIME | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | PHARMACY | 60 |
| 2 | 1-2472826803 | Buldhana | DR. R. N. LAHOTI INSTITUTE OF PHARMACY SULTANPUR | JALNA ROAD, SULTANPUR, TQ. LONAR,DIST. BULDANA | Unaided - Private | PHARMACY | DIPLOMA | 1st Shift | FULL TIME | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | PHARMACY | 60 |
| 3 | 1-2494566071 | Aurangabad | COLLEGE OF PHARMACY(D. PHARM) | GUT NO:11, KHANDALA, TQ. VAIJAPUR, Dist-Aurangabad | Unaided - Private | PHARMACY | DIPLOMA | 1st Shift | FULL TIME | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | PHARMACY | 60 |
| 4 | 1-2522098071 | Aurangabad | LATE BHAGIRATHI YASHWANTRAO PATHRIKAR COLLEGE OF D.PHARMACY | AT POST PATHRI TQ.PHULAMBRI DIST.AURANGABAD | Unaided - Private | PHARMACY | DIPLOMA | 1st Shift | FULL TIME | MSBTE MUMBAI | PHARMACY | 60 |
| 5 | 1-2506616831 | Nanded | SWARGIYA ULAWATI SATISH AWHAD D. PHARMACY COLLEGE (MINORITY) D. PHARMACY COLLEGE | AT POST KHARAB KHANDGAON, TQ. MUKHED, DIST. NANDED | Unaided - Private | PHARMACY | DIPLOMA | 1st Shift | FULL TIME | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | PHARMACY | 60 |
| 6 | 1-2481059741 | Parbhani | WARPUDKAR INSTITUTE OF PHARMACY [D.PHARMACY] | GUT. NO. 461 BEHIND RENUKA MATA TEMPLE, AT. PEDGAON TQ. DIST. PARBHANI | Unaided - Private | PHARMACY | DIPLOMA | 1st Shift | FULL TIME | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | PHARMACY | 60 |
| 7 | 1-2511179721 | Parbhani | PRERNA INSTITUTE OF PHARMACY [D.PHARMACY] | GUT. NO. 104, OPP. WATER FILTER PLANT, KAREGAON BASMATH ROAD, PARBHANI | Unaided - Private | PHARMACY | DIPLOMA | 1st Shift | FULL TIME | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | PHARMACY | 60 |
| 8 | 1-2488592381 | Parbhani | COLLEGE OF PHARMACY (D.PHARM) | AT POST PATHRI, PATHRI, Dist. Parbhani | Unaided - Private | PHARMACY | DIPLOMA | 1st Shift | FULL TIME | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | PHARMACY | 60 |
| 9 | 1-2467359711 | Dhule | AHINSA INSTITUTE OF PHARMACY | DHULE ROAD, DONDAICHA, Dist-Dhule | Unaided - Private | PHARMACY | DIPLOMA | 1st Shift | FULL TIME | Maharashtra State Board of Technical Education | PHARMACY | 60 |
| 10 | 1-2499591631 | Jalgaon | SHRI SAI INSTITUTE OF TECHNOLOGY | GAT NO. 15/1, DEVLI/DEVGAON, TAL AMALNER, DIST. JALGAON | Unaided - Private | ENGINEERING AND TECHNOLOGY | DIPLOMA | 1st Shift | FULL TIME | Maharashtra State Board of Technical Education, Mumbai | CIVIL ENGINEERING | 60 |

Principal
Dr.R.N.Lahoti Institute of Pharmacy
Sultanpur,Tq.Lonar Dist Buldana

Principal
Dr.R.N.Lahoti Institute of Pharmacy,
Sultanpur,Tq.Lonar Dist Buldana